# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## National Service Scheme

Dr. V. S. Irpate (I/c.)
Programme Coordinator
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/227/2016

Dt: 18/04/2016

## स्मरणपत्र

प्रति,

मा. प्राचार्य

गोंडवाना विद्यापीठ संलग्नित सर्व रासेयो महाविद्यालये.

**विषय : रासेयो वार्षिक अहवाल (शिबीर व नियमित कार्यक्रम) २०१५–२०१६ तसेच वार्षिक प्रलेखे व अंकेक्षण विवरणे सादर करणेबाबत.**

संदर्भ : १)पत्र क्र. No.GU/NSS/209/2016, दि. ११/०३/२०१६
२)पत्र क्र. No.GU/NSS/210/2016, दि. ११/०३/२०१६

महोदय,

उपरोक्त विषयानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, २०१५–२०१६ या शैक्षणिक सत्राचे विशेष शिबीर व नियमित कार्यक्रम अहवाल रासेयो कार्यपुस्तिकेत दिलेल्या अहवाल नमूना परिशिष्ट क्र. ६ व क्र. ७ प्रमाणे देवून त्यासोबत पेपर कात्रणे (मुळ) व निवडक छायाचित्रे (मुळ) संलग्न करुन दि. ३० मार्च २०१६ पर्यंत सादर करावा, तसेच नियमित व विशेष शिबीर अनुदानाचे वार्षिक प्रलेखे व अंकेक्षण विवरणे विहित नमुन्यामध्ये दि. १० एप्रिल २०१६ पर्यंत रासेयो कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे सादर करावे, असे संदर्भांकीत पत्रानुसार कळविण्यात आले होते.

परंतु अद्यापही अधिकांश महाविद्यालयांनी विशेष शिबीर व नियमित कार्यक्रम अहवाल तसेच नियमित व विशेष शिबीर अनुदानाचे वार्षिक प्रलेखे व अंकेक्षण विवरणे सादर केले नाहीत. ज्या महाविद्यालयांनी उपरोक्त अहवाल आणि प्रलेखे व अंकेक्षण विवरणे सादर केले नाही, त्या महाविद्यालयांनी दिलेले रासेयो अनुदान खर्च केले नसून महाविद्यालयाकडे शिल्लक आहे असे समजण्यात येईल. शासनाचे वतीने अनुदान कपात झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील, कृपया याची नोंद घ्यावी. करिता **दि. २८/०४/२०१६** पर्यंत अहवाल आणि प्रलेखे व अंकेक्षण विवरणे रासेयो कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे सादर करावे, हि विनंती.

कळावे.

धन्यवाद!

कार्यक्रम समन्वयक (प्र.)
राष्ट्रीय सेवा योजना

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली